Vol 3 Issue 5 Nov 2013

Impact Factor : 1.9508 (UIF)

ISSN No :2231-5063

# Monthly Multidisciplinary Research Journal

# *GoldenResearch Thoughts*

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**IMPACT FACTOR : 1.9508 (UIF)**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Golden Research Thoughts
Volume-3, Issue-5, Nov-2013
ISSN 2231-5063

Available online at www.aygrt.isrj.net

# गोंदिया जिल्हातील बालकामबारांच्या समस्या निवारणात (इंडस) बालमजूर निर्मूलन प्रकल्पाची भूमिका

अनिता बगमारे (राऊत )
गृहअर्थशास्त्र विभाग आदर्श महाविद्यालय , देसाईगंज जि. गडचिरोली (म. रा.)

***सारांश:*** ''मुले म्हणजे देवाघरची फुले'' असे पुज्य साने गुरूजी म्हणत असत. फुलांची जोपासना चांगल्याप्रकारे केल्यास ती चांगला व सुदंर उमलतात. मोठमोठया नेत्यांना हातात संपत्ती-सत्ता असतांना सुद्धा ''रम्य ते बालपण '' असे वाटत असते. म्हणूनच पं. जवाहरलाल नेहरू, महात्मा गांधी यांसारखे थोर नेते देखील क्षणभर का होईना बालकांमध्ये मिसळून आपले बालपण परत अनुभवण्याचा प्रयत्न करित असत. '' कुंभार ज्याप्रमाणे ओल्या मातीला नानाविध आकार देवून तिच्या सुदंर वस्तू तयार करित असतो. त्याचप्रमाणे बालक हे सुद्धा ओली मातीच असते.''

***प्रस्तावना:***

श्री. नरेद्रं चौधरी यांच्या मते ''बालक म्हटले की छोटा, निरागस, निष्पाप जीव होय.'' मित्रांबरोबर खेळणारे, आई वडिलांचे ऐकणारे, कामात मदत करणारे, इतर वडिलधा-यांचा आदर करणारे, पुस्तक, टि. व्हि., सहलीचा आंनद घेणारे, शाळेत जाणारे असे गोडंस चित्र सर्वांच्या नजरेपुढे उभे राहते.

बालक जेव्हा आपल्या बालपणाला पोरके होऊन कामावर लागतात व लहान मोठया उदयोगात तसेच व्यवसायात काम करतात तेव्हा त्यांना बालश्रमिक किंवा बालमजुर म्हटले जाते.

मुलांच्या शारिरीक, मानसिक, शैक्षणिक किंवा सामाजिक विकासावर परिणाम करणारे, धोकादायक आणि शोषणावार काम त्यांच्याकडून करवून घेणे म्हणजे बालकामगार प्रथा. याचे उच्चाटन व्हायला हवे. अशा मुलांचे आर्थिक शोषण होतेच पण शारिरीक,लैगिंक अत्याचारही केले जातात. त्यांच्याकडून अवजड कामे करवून घेतले जातात . दिवसातून पंधरा-पंधरा तास काम करवून घेतले जाते. अनारोग्यदायी आणि असुरक्षित स्थितीत मुलांना काम करावे लागते. वाढते शहरीकरण आणि स्वस्त कामगारांच्या मागणीमुळे अधिकाअधिक मुले कामाला जुपंली जात आहेत.

बहुतांश वेळा या उपेक्षित बालकांचे शोषण, त्यांचे जन्मदाते आई-बापच करित असतात. अत्यंत गरीब, त्यातून व्यसनी आणि अशिक्षित आई-बापांनी एकापाठोपाठ एक जन्माला घातलेली अनेक भांवड ही त्यांच्या लेखी 'खाणारी तोंडं' नसतात तर उलट 'कमावणारे हात असतात'. कुपोषित, गरिब, व्यसनी माता-पिता वयाच्या तीस-पस्तीशीतच खंगलेली शरीर घेउन जगत असतात. ही उघडीनागडी पण ' कमावणारी ' पोरं हा त्यांचा ॲसेट असतो.

युनायटेड स्टेटस नॅशनल चाईल्ड लेबर कमिटीचे चेअरमन होमर फोक :

''बालकामगार म्हणजे मुलांनी केलेले असे कोणतेही काम की ज्यामुळे त्यांच्या पूर्ण शारिरीक विकासामध्ये, किमान शैक्षणिक पातळी गाठण्याच्या संधीमध्ये किंवा आवश्यक मनोरंजनामध्ये बाधा उत्पन्न होते.

" Any work by children that interfers with their full physical development, their opportunities for a desirable minimum level of education or their needed recreation."

खेळण्या-बागडण्याच्या, शाळेत जाण्याच्या वयामध्ये मुलांचा शरिरीक विकास होत असतो. याच वयामध्ये जर त्यांना चार पैसे कमविण्यासाठी किंवा अन्य कारणाने श्रम किंवा मजुरी करावी लागत असेल तर त्याचा परिणाम त्यांच्या शारिरीक, मानसिक विकासावर होतो. त्यामुळेच समाजशास्त्रज्ञ, मानसशास्त्रज्ञ, शिक्षणतज्ञ, वैदयकतज्ञ यांना बालकामगार ही मुलांच्या सर्वागीण विकासातील धोंड वाटते.

संशोधनाची उद्दिष्टे :

१) बालसंक्रमण शाळेतील शिक्षकांचे मत जाणून घेणे.
२) प्रकल्प अधिका-याचे मत जाणून घेणे.

गृहितके

१) विद्यार्थ्यांच्या सर्वागिण प्रगतीकरिता शिक्षक प्रयत्नशील असतात.
२) बालकामगार प्रथाविरूद्ध कायदा प्रभावीपणे राबविता येत नाही.

संशोधनाची व्याप्ती

१) प्रस्तूत अध्ययनात गोदिंया जिल्हयात येणा-या बालमजूर निर्मूलन प्रकल्पाचा अभ्यास करणारा आहे.
२)प्रस्तूत अध्ययनाकरिता ६३३ इंडसच्या लाभार्थी बालकामगारांची निवड करण्यात आली.
३)अध्ययनासाठी जुना टप्पा २००७ ते २००८ आणि नविन टप्पा २०११ ते २०१२ चा कालावधी विचारात घेण्यात आलेला आहे.

नमुना निवड

प्रस्तूत अध्ययनासाठी बालमजूर निर्मूलन प्रकल्पाव्दारे सुरू करण्यात आलेल्या बालसंक्रमणशाळातील पहिल्या टप्यातील आठ शाळांमधून ३१९ बालकामगार विदयार्थी आणि दुस-या टप्यातील सात शाळांमधून ३१४ बालकामगार विदयार्थी .याचबरोबर त्याचे पालक. संक्रमण शाळांतील शिक्षक. संस्थाचालक, प्रकल्प अधिकारी यांची निवड करण्यात आली.

तथ्य संकलन पध्दती आणि तंत्रे

प्रस्तूत विषयाच्या संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा अवंलब करण्यात आला. यासाठी मुलाखत अनुसूची तयार करण्यात आली. तथ्य गोळा करण्यात आली. संकलित तथ्याची प्रामाण्य सिध्द करण्याकरिता काय स्केअर ($x^2$) चाचणी आणि संभावना अंक (ब) .मध्य. सहसंबध या साधनाचा उपयोग घेण्यात आलेला आहे.

संकलित माहितीचे प्रस्तूतीकरण व स्पष्टीकरण :

शिक्षकांद्वारे प्रकल्प लाभार्थ्यांच्या प्रतिक्रिया :

सारणी क्र. ५ वरून दिसून येते की, शाळेतील नियमितता , शिस्त, विकास, निरंतरतेसाठी, एकाग्रतेसाठी अतिशय आवश्यक आहे. कारण कोणतेही असो एकदा मुले अनियमित झाले की, ते अभ्यासात मागे पडतात. शिकविलेले समजत नाही त्यामुळे पुढचे शिक्षण समजत नाही आणि हळूहळू मुलं टाळाटाळ करू लागतात. जुन्या टप्यातील १०० टक्के शिक्षकांचया मते मुले शाळेत नियमित उपस्थित राहतात. तर नविन टप्यातील १०० टक्के शिक्षकाच्या मते मुले अनियमित उपस्थित राहतात. शिक्षणाचे महत्व जोवर पालक आणि बालक गंभीरपणे समजून घेत नाही तोवर ही अनियमितता हेच त्यांचे वैशिष्टय होणार आहे. धर्मिक किंवा पारंपारिक पगडयामुळे फकीर समाजातील मुलांचे शुक्रवारी (जुम्मा) भिक मागण्यास जाणे अनिवार्य समजतात. त्यामुळे त्यांची शाळेतील अनुपस्थिती हे शुक्रवारचे अविभाज्य वैशिष्टय आहे.अदासी येथील नाथजोगी शनिवारी तेल मागण्यास जाणे अनिवार्य समजतात. त्यामुळे त्यांची शनिवारची नियमित अनुपस्थिती असतेच. तसेच काही मुले आळसाने किंवा पालकांच्या सोबतीने कामाला जात असल्याने अनुपस्थित राहतात. पालकांच्या बाहेर जाण्याच्या समस्येमुळे घरकामाची जबाबदारी या मुलांवर येते. त्यामुळे या मुलांना घरकामासाठी घरी राहावे लागते. म्हणून मुले शाळेत येउु शकत नाही. उशिरा गेल्यास शिक्षा होते, शिक्षक रागावतात, वर्गसोबती हसतात म्हणून मुले घरी काही कारणाने उशिर झाल्यास जाणे टाळतात असे शिक्षकांचे म्हणणे होते.

विदयार्थ्यी सहा ते सात तास शाळेत राहतात दुपारच्या भुकेच्या वेळेला मध्यान्ह भोजन किंवा (खिचडी) मिळाल्यास मुले पुर्णवेळ शाळेत थांबतात. नविन टप्यात मध्यान्ह भोजन न मिळाल्यामुळे मुलांचा शाळेत थांबण्याचा अवधी हा कमी आहे. दुपारच्या सुट्टीत मुले घरी गेल्यानंतर त्यांना पुन्हा घरी जाउन आणावे लागते. कारण घरून शाळेत पाठविणारेही कोणी नसते. त्यामुळे मुले पुर्णवेळ थांबत नाहीत. नविन टप्यात ४२.११टक्के शिक्षकांच्या मते मुले पुर्णवेळ शाळेत थांबतात. तर ५७.८९ टक्के शिक्षकांच्या मते मुले अपुर्णवेळ शाळेत थांबतात. कारण या मुलांना बाहेर फिरणे आवडते. घरी जाउन पुन्हा शाळेत येण्याचा कंटाळा येतो.त्यांच्या घरचे पालक बाहेर कामाला जात असल्याने ते शाळेज येण्यास टाळाटाळ करतात. (विशेषत: मुली) घरकामाच्या ओझ्यामुळे, अचानक पाहुणे घरी आल्यास सोबती मिळाल्यास, आंबे, बोर, चिंचा झाडाला लागले असल्यास, घरी कोणी बारकाईने विचारणारे नसल्यास मुले शाळेत पुर्णवेळ शाळेत थांबत नाहीत. सोबत बाहेरच्या कामाचे किंवा भिक्षेतून मिळणा-या पैशाचे आकर्षणच असते. या सर्व कारणामुळे मुले अपुर्णवेळ शाळेत थांबतात.

संस्कार आणि शिक्षणाने मुलांना स्वच्छतेचे रोजच्या जीवनात आदर्शाचे अनुकरण करूनही शिकता येते. परंतू घरी असणारे आदर्श अयोग्य, अपुरे असले तर मुले त्यांचेच अनुकरण करतात. परंतु शिक्षण म्हणजे जादुची छडी सुद्धा आहे. सरस्वती म्हणजे भाषा, वागणूक, विचारात सरलता आणणारी, संस्कार आणणारी, शिक्षणाने, संस्काराने ४५ टक्के शिक्षकांच्या मतानुसार मुले स्वच्छ राहू लागली आहेत. ५० टक्के शिक्षकांच्या मतानुसार साधरण, ५टक्के शिक्षकांच्या मतानुसार मुले अस्वच्छ राहतात. म्हणजेच बालसंक्रमण शाळेत येण्यापुर्वी मुले किती अस्वच्छ राहत होती याची कल्पना न केलेली बरी. अस्वच्छता हे त्यांचे वैशिष्टयच होते. याची त्यांना काहीही तमा नव्हती. घाणेरडे राहण्याची आता त्यांना लाज वाटू लागली आहे. तरीही सामान्य शाळेतील मुले या मुलांना आपल्यासोबत बसू देत नाहीत. तिरोडा, सालेकसा. येथील मुलांमध्ये अस्वच्छता होती. मुंडिकोटा येथील मुले साधारण होती. तर अदासी, गोंदिया येथील मुले ही पुर्णपणे स्वच्छ राहतात असे निरीक्षणातून दिसून आली तशी शिक्षकांची प्रतिक्रिया होती.

अस्वच्छतेमुळे बरेचसे आजारही विशेषत: त्वचाविकार, पोटविकार, पोटात जंत, खाज इत्यादी होतात. स्वच्छतेची मुळे आणि आरोग्याचे महत्व, स्वच्छता आणि आरोग्याचे महत्व, स्वच्छता आणि आरोग्याचा संबंध, आरोग्याचा रोजगाराच्या मिळकतीशी संबंध याबाबी कुटूंबियाच्या ध्यानीमनी उतरविणे आवश्यक आहे. स्वच्छतेचा अर्थ व क्षेत्र त्यांना विस्तृत आणि सविस्तरपणे समजवून दयावे. व्यक्तीगत व शारिरीक, स्वच्छता, परिसर स्वच्छता, भांडे घासण्याच्या जागेची स्वच्छता, आजूबाजूच्या पर्यावरणातील स्वच्छता ही महत्वाची क्षेत्रे त्यांच्या लाभासकट समजावून दयावयास हवे. आरोग्य विभागाने त्यासंबंधी टेलीफिल्म वस्त्या-वस्त्या, पाडया-पाडयावर मनोरंजनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करावे.

आनंदाची बाब म्हणजे संक्रमण शाळेतील एकूण ६७.५ टक्के शिक्षकांच्या मते मुले स्वताहून शाळेत येतात. शाळेतील विविध कार्यक्रमात स्वत:हून सहभागी होतात. शैक्षणिक कार्यक्रमात सहभागी होतात.प्रेरीत सहभाग २० टक्के शिक्षकाच्या मतानुसार सहभागी होतात.स्वत:हून थोडया प्रमाणात सहभागी होतात. थोडया प्रमाणत सांगावे लागते. सोबत्यासोबत थोडया प्रमाणात सहभागी होतात. १२.५टक्के शिक्षकांच्या मतानुसार मुले ही निरूत्साही आहेत त्यांना रोज बोलवायला जावे लागते. ही मुले कामचुकार, पळून जाणरी,शाळा शिकण्यात रस नसणारी आहेत. या मुलांना नकला कार्यक्रमात सहभागी करून त्यांचा शाळेतील सहभाग वाढविता येईल.

ज्या समाजाला शिक्षणाचा गंध नव्हता, शिक्षण म्हणजे दुरचे दर्शन त्या समाजातील पालकांची मुले संक्रमण शाळेमुळे ७५.१ टक्के शिक्षकांच्या मते मुले लिहू वाचू शकले आहेत तर २० टक्के शिक्षकांच्या मतानुसार मुलांची प्रगती साधारण आहे. तर ६ टक्के शिक्षकानुसार असमाधानकारक आहे. या मुलांना शब्द ओळख नाही, शाळेबद्दल नावड असल्यामुळे, इतर घरगुती कारणामुळे, शाळेत अतिशय अनियमितता असल्यामुळे या मुलांची शैक्षणिक प्रगती कमी आहे असे शिक्षकांचे मत आहे. या मुलांच्या अनियमिततेचे कारण शोधून त्यावर विशिष्ट उपचार उपयोगात आणल्यास किंवा वापरल्यास ही मुले शिक्षणात प्रगती करू शकतील अशी निश्चितपणे खात्री बाळगता येते.कारण जशी समस्या तसा उपाय उदा. न येणारे मुले आल्यास पेपरमिंटच्या गोळया देणे.

बालसंक्रमण शाळेतील मुलांच्या अभ्यासक्रमाचे मुख्यत: चार विभाग आहेत. शैक्षणिक अभ्यासक्रमाचा मुळ आधार मुळाक्षरे, जोडाक्षर, वाक्य बनविणे, शब्द ओळख, चित्र ओळख, अंकगणित, अंकाची ओळख शिकविल्या जाते अशी शिक्षकांची प्रतिक्रिया होती. व्यावसायीक अभ्यासक्रमाचा मुळ आधार मातीकाम, चित्रकाम, कागदाच्या विविध वस्तू बनविणे, लेटरपॅड, पेन होल्डर, वॉलहॅगिंग इत्यादी शिकविल्या जाते अशी शिक्षकांची प्रतिक्रिया होती. जीवनकौशल्य अभ्यासक्रमाचा मुळ आधार संभाषण कौशल्य,, स्वत:ची ओळख, आपत्ती व्यवस्थापन, वेळेचे व्यवस्थापन, निर्णयप्रक्रिया, सामुहिक कार्य करणे इत्यादी शिकविल्या जाते अशी शिक्षकांची प्रतिक्रिया होती. विदयार्थ्याच्या सामान्य ज्ञानात वाढ व्हावी यासाठी दिनाचे औचित्य साधून विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. १४ एप्रिल आंबेडकर जयंती, १४ नोव्हेबंर बालकदिन, १२ जुन बालकामगारविरोधी दिन इत्यादीची माहीती दिल्या जाते. या दिवसांमध्ये भाषणे, रॅली इत्यादिचे आयोजन केल्या जाते. ही सगळे १०० टक्के शिक्षकांची प्रतिक्रिया होती.

बालमजुरीने बालकांना शारिरीक, मानसिक, सामाजिक आरोग्यावर परिणाम होतात. त्यामुळे बालकांना त्यांच्या स्वांतत्राचा उपभोग घेता यावा. शिक्षणाच्या मदतीने मुलांचा सर्वागिण विकास व्हावा. कोणत्याही १४ वर्षा खालील मुलांना कामावर ठेवू नये यासाठी समाजात जनजागृती व्हावी म्हणून १२ जून बालकामगारविरोधी दिन या दिवशी गावातून रॅली काढणे, दर महिन्याला शेवटच्या शनिवारला पालक सभा घेउन त्यावेळेला पालकांना बालमजुरीच्या दुष्परिणामाची माहिती सांगणे.

सर्वानुमते रॅली, पालकसभा, मार्गदर्शन इत्यादीचे आयोजन नियमितपणे केले जाते. सर्वाचा सहभाग या कार्यक्रमात असतो. रॅली, बालमजुरविरोधी दिन व सप्ताहानिमित्त स्थानिय पातळीवर कार्यक्रम आयोजित केले जातात. पालकांना मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात सामील केल्यास त्यांच्यातील कलागुणांना वाव मिळून ते योग्य दिशेने कार्य प्रवृत्त होतील. पालकांच्या बचतगटाची निर्मिती केली आहे. व या बचतगटातील पालकांना कौशल्य प्रशिक्षण दिले जाते. ज्यामुळे पालक या व्यवसायाऐवजी दुसरे चांगले व्यवसाय करू शकतील व्यसनमुक्ती, आरोग्य संबंधी मार्गदर्शन पालकांना केले जाते. तज्ञ व्यक्ती, विषय तज्ञ, समाजसेवी, संबंधित कार्यकारी अधिकारी यांना बोलावून पालकांना मार्गदर्शन केले जाते. या सर्वाचा उद्देश बालमजुरी हा कायदयाने गुन्हा आहे.याची जाणीव पालकांना, सामाजिक घटकांना व बालकांना व्हावी जेणेकरून बालमजुरीचा कलंक मिटविणे शक्य होईल.

शिक्षकांचे वेतन अपुरे व अनियमित असल्यामुळे शिक्षक असमाधनी आहेत. या शाळा स्वयंसेवी संस्थाद्वारे चालविल्या जातात. त्यामुळेही अनियमितता वेतनाबद्दल आढळून आल्यात याचा परिणाम मुलांना शिकविण्यावर होतो. मुलांची उपस्थिती अपुर्णवेळ असल्याने शिकविण्यात अडचणी निर्माण होतात. आई-वडिल मुलांच्या अभ्यासाच्या अधिक प्रमाणात विरोधात आहेत. याचा विपरित परिणाम मुलांच्या नियमित शिकण्यावर होतो. पालकांना विकासाची फारशी जाणीव नाही ज्यामुळे विकासाची संकल्पनाच यांच्यात रूजलेली नाही. त्यामुळे त्या दिशेने कोणतेही प्रयत्न कुटूंबातून होतांना दिसून येत नाही.

एक आनंदाची गोष्ट म्हणजे कोणीही बालक लैंगिक अत्याचार पिडित नाही खरेतर अधिक नाजूक प्रश्न परंतू पालनपोषणच या पद्धतीने केले जाते की जेणेकरून मुले सर्वत्र बिनधास्तपणे वावरतात.

प्रकल्प अधिकारी यांच्या प्रतिक्रिया :

एकूण तीन प्रक्रल्प अधिका-यांच्या प्रतिक्रिया घेण्यात आल्या. सध्या प्रकल्पाअंतर्गत तीन अधिकारी कार्यरत आहेत. त्यांच्या प्रतिक्रिया खाली नोदंविल्या आहेत.

अनुदान देताना विद्यार्थ्याची शाळेतील संख्या आणि विद्यार्थ्याना मिळणा-या सोयी या दोन बाबी महत्वाच्या आहेत . याचबारोबर इमारत खर्च, पाणी इत्यादी बाबीचाही अनुदान देतांना विचार करण्यात येतो.

शाळेचे व्यवस्थापन व्यवस्थित व्हावे, मुलांचा उत्तम विकास व्हावा यासाठी शाळा व्यवस्थापनावर देखरेख केली जाते. यासाठी महिन्यातून एकदा शिक्षक सभा प्रकल्प अधिकारी कार्यालयात घेतली जाते.त्याचप्रमाणे प्रकल्प अधिकारी गरजेनुसार तर कधी सोयीनुसार भेट देउन माहिती घेतात. फोनद्वारे संपर्क आणि चौकशी ही गरजेनुसार सुरू असते.

प्राामुख्याने इंडस कार्यालय हेच प्रशिक्षण स्थळ आहे. या सभा समाजभवन गोंदिया येथे आयोजित केल्या जातात. त्याचप्रमाणे विशिष्ट प्रशिक्षण यशदा या संस्थेद्वारे विशेष तज्ञाद्वारे मार्गदर्शन देउन शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात येते. ज्यामुळे शिक्षक आपले कार्य उत्तमरित्या करू शकतील. प्रशिक्षणाचा अवधी व घटक, अडचणी. साधन सामुग्री या सर्व बाबी विचारात घेउन दोन्ही स्थळी प्रशिक्षण देण्यात येते. प्रशिक्षणाचा अवधी हा विषयानुसार व गरजेनुसार कमी अधिक असतो.

हे विद्यार्थी अतिशय संघर्षातून जीवन जगत असतात. यांना शिक्षण आणि जीवन यापेक्षा जीवनाचा संघर्ष हा जीवनाचा गाभा वाटतो. त्यामुळे उदरभरणाच्या पोषणासाठी अधिक लक्ष व वेळ दिल्या जातो. हे लक्षात घेउन विद्यार्थी अधिक संख्येने पुढे यावेत, या विद्यार्थ्यासाठी काही विशेष सवलती व पुरस्कार असायला हवे होते. परंतू तसे नाहीत. यशदा ही सेवाभावी संस्था आहे. राज्य सरकार या संसथेला फक्त अनुदान देते आणि बालकामगार विद्यार्थ्यांना लागणारे साहित्य, शिक्षण, प्रशिक्षण यशदा तर्फे दिल्या जाते.

प्रकल्प अधिकारीचे कार्य म्हणजे प्रामुख्याने पालकांना व शिक्षकांना मार्गदर्शन करणे हे आहे.ज्यामुळे शिक्षक विद्यार्थ्याना अधिक प्रभावशाली मार्गदर्शन करतील व पालक मुलांच्या शिक्षणात अधिक सहभाग देतील. समाजात बालकामगार प्रथेविरूद्ध जनजागृती करणे प्रकल्प अधिका-यांनी याबाबत खात्रीलायक सांगीतले आहे.

कार्यालयीन कामे, शिक्षकांना प्रशिक्षण, पालकांना मार्गदर्शन, विद्यार्थ्याना

शिक्षणाकडे आकृष्ट करण्याकरिता अनेक अडचणी येतात. या अडचणीवर मात करण्यासाठी प्रकल्प अधिकारी हे यशदा चा सल्ला गरजेनुसार घेतला जातो.

याचबरोबर बालकामगार कायदयाची अंमलबजावणी प्रभावीपणे अंमलात आणता येत नाही. कारण काही पालक आणि व्यावसायिक पकडून आणलेल्या बालकामगारांच्या सुटकेसाठी कसोशीने प्रयत्न करतात आणि सोडवून नेतात. समाजातील व्यक्तींचा पाहिजे तितका सहभाग मिळत नाही.

निष्कर्ष :

१) बालसंक्रमण शाळेतील शिक्षक विदयार्थ्यांच्या सर्वांगिण प्रगतीकरिता , त्यांच्यात शिक्षणाची आवड निर्माण व्हावी ,त्यांचा सर्वांगिण विकास व्हावा म्हणून शैक्षणिक, सांस्कृतिक,व्यावसायिक कौशल्य शिकवितात. याचबरोबर इतरही शिक्षण दिल्या जाते.

२) शाळा संचालनाकरिता प्रकल्पाला मिळणा-या मदतीबद्दल जुन्या टप्यातील संचालक असमाधानी तर नविन टप्यातील संचालक समाधानी आहेत. असमाधानाचे कारण बालकामगांराना शिक्षणाबद्दल आवड निर्माण व्हावी यासाठी त्यांनी स्वखर्चाने सोयीसवलती उपलब्ध करून दिल्या. परंतू शासकिय दिरंगाईमुळे , जिल्हाधिका-यांच्या स्थांनातरामुळे त्यांनी खर्च केलेला पैसा मिळण्यास उशीर झाला.

३) प्रकल्प अधिकारी यांना प्रकल्पाअंतर्गत कार्य करतांना शिक्षक अनुदान, विदयार्थी ,कार्यालयिन कामकाज, समाजात बालकामगारप्रथा विरूद्ध जनजागृती,हे सर्व कार्य करतांना अनेक अडचणी येतात. बालकामगार कायदयाची अंमलबजावणी प्रभावीपणे होत नाही. पालक किंवा व्यवसाय मालक हे स्वत:च बालमजुरी करणा-या मुलांना पकडल्यास सोडवून नेतात. पालक समजून घेत नाहीत.

गृहितकाची सत्यता :

१) विदयार्थ्यांच्या सर्वांगिण प्रगतीकरिता शिक्षक यथासंभव प्रयत्न करतात. मुलांचा शारिरीक,बौद्धिक, सामाजिक विकास व्हावा यासाठी मैदानी, सांस्कृतिक कार्यक्रमांबरोबर व्यावसायीक आणि जीवनकौशल्य विषयक शिक्षण देतात. हे सारणी क्र. ५ वरून दिसून येते.

२) पालकांना व समाजात जनजागृती करण्याचे कार्य कठिण आहे. बालकामगार समस्या सोडविण्यासाठी बालकांचे पालक, समाज, व्यावसायीक यांचे सहकार्य अपेक्षेपेक्षा कमी मिळते. त्यामुळे बालकामगार प्रथाविरूद्ध कायदा प्रभावीपणे अंमलात आणता येत नाही. पालकांना पैसा महत्वपूर्ण वाटतो हे सारणी क्र.७ वरून स्पष्ट होते.

शिफारशी :

१) वस्त्या-वस्त्यांमध्ये व्यसनमुक्तीचे कार्यक्रम घ्यावे यासाठी त्याच वस्तीतील व्यसन नसलेल्या मुलांना या कार्यक्रमात सहभागी करून घेतल्यास त्याचा अधिक चांगला परिणाम होईल.

२) विदयावेतनाचा उपयोग योग्य आणि आवश्यक वस्तूंवर खर्च करण्यासंबधीचे योग्य मार्गदर्शन मुलांना करावे.

३) विदयार्थ्यांना सकस, स्वच्छ आणि विविधतापूर्ण मध्यान्ह भोजन दयावे. शरीर बांधणीमध्ये आहाराचे महत्व पटवून दयावे . शब्द संपत्तीमध्ये वाढ होण्यासाठी रोज उपयोगात आणल्या जाणा-या विविध भाज्यांची नावे सांगत जावेत.

४) पालकांना कबाडी गोळा करण्यासाठी जाड, रबरी हॅन्डग्लोज पुरविण्यात यावे व कबाडी विकून येणा-या पैशाचा विनियोग व गुंतवणूकीबद्दल योग्य मार्गदर्शन करावे.

५) मुलांचा शाळेतील सहभाग वाढविण्यासाठी नकला कार्यक्रमाचा समावेश करावा.

६) भटक्या स्वरूपात राहणा-या लोकांना कायमस्वरूपी रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी प्रयत्न करावे.

७) सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत बालमजुरांची नावे दाखल करतांना त्यांना इतर (जन्माचा,रहीवाशी दाखला इ.)कागदपत्रे आवश्यक आहेत अशी बंधने लादू नयेत.

संदर्भसूची


| अ.क्र | . लेखकांचे नाव | पुस्तकांचे नाव | प्रकाशकांचे नाव |
|---|---|---|---|
| १ | **Chief Editors Dr.Pathan K.G.& Dr.Mangnale V.S.** | **Sandarbha Maharashtra [State&District AGlance]Set in 2 Vol.l** | **Intellctual Book Beral,Narayan Nagar,Bhopal(M.P.)** |
| २ | **www.ilo.org/Childlabour** | | |
| ३ | **www.ilo.org/pudlns OR www.ilo.org/india** | | |
| ४ | **,.yashada.org** | | |
| ५ | आगलावे प्रदिप | संशोधन पद्धती व शास्त्रे | नगपूर,विदया प्रकाशन,२००० |
| ६ | क-हाडे . बी.एस. | शास्त्रीय संशोधन पद्धती | पिंपळापुरेॲण्ड कं.पब्लीकेशन ,महाल नागपुर,जानेवारी २००७ |
| ७ | गायकवाड श्री.रत्नाकर | बालकामगार निर्मुलन -संदर्भ साहित्य | बालहक्क कक्ष,संशोधन व प्रलेखन विभाग, यशदा पुणे (य.न.वि.प्र.पुणे) |
| ८ | सौ. गणोरकर मीना सुनिल | बालविकास | **R.A.Kulkarni Cotinental Prakasan Vidyansagar,Poona-...Œ** |

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net